# सक्षम बनवणारा अभ्यासक्रम

दहावीची परीक्षा रद्द झाल्यानंतर इंजिनीअरिंग डिप्लोमाच्या प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा होणार अशी चर्चा रंगली होती.



मात्र, दहावीच्या गुणांच्या आधारेच डिप्लोमा प्रवेशप्रक्रिया पार पडणार असल्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले. यामुळे हजारो विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. ही प्रवेश प्रक्रिया कशी होणार? डिप्लोमा का करावा? याबाबत तंत्र शिक्षण संचालक अभय वाघ यांची ही मुलाखत.






**■ डिप्लोमा प्रवेश प्रक्रियेत नेमके काय बदल केले आहेत?**

दहावी व बारावीनंतर इंजिनीअरिंग डिप्लोमा अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट दहावी व बारावीच्या गुणांच्या आधारे प्रवेश दिले जाणार आहेत. यासाठी प्रवेशाच्या दोन फेऱ्या घेतल्या जाणार आहेत. यंदा प्रवेश नियमांमध्ये काही बदल करण्यात आले आहेत. यात यंदा प्रथमच काश्मिरी पंडित यांच्यासाठी जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत. याचबरोबर इयत्ता बारावीतून डिप्लोमाच्या दुसऱ्या वर्षाला प्रवेश घेताना भौतिकशास्त्र, रसायनशास्त्राची अट शिथिल करण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.

**■ डिप्लोमासाठीची अर्ज प्रक्रिया कशी असेल?**

अर्ज प्रक्रिया आणि त्याचा सर्व तपशील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वेबसाइटवर मिळेल. गतवर्षीप्रमाणे यंदाही ही सर्व प्रक्रिया ऑनलाइन पार पडणार आहे. विद्यार्थी अगदी मोबाइलवरूनही अर्ज भरू शकणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांना मोबाइल, लॅपटॉप किंवा अन्य कोणते उपकरण उपलब्ध नसेल, अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या जवळच्या सुविधा केंद्रावर जाऊन अर्ज करता येणार आहे. गतवर्षीप्रमाणे यंदाही तालुका स्तरावर सुविधा केंद्र सुरू करण्यात येणार आहे. डिप्लोमा अभ्यासक्रमाबाबत जागृती व्हावी या उद्देशाने आम्ही 'स्कूल कनेक्ट' उपक्रम राबविला. या माध्यमातून पाच लाख विद्यार्थ्यांपर्यंत आम्ही पोहाचलो आहोत. त्या विद्यार्थ्यांना 'एसएमएस'च्याद्वारे डिप्लोमा प्रवेश प्रक्रियेची माहिती पुरविली जाणार आहे.

**■ डिप्लोमा अभ्यासक्रमांमध्ये काळानुरूप कोणते बदल करण्यात आले आहेत?**

डिप्लोमा अभ्यासक्रमांमध्ये काळानुरूप अनेक बदल करण्यात आले आहेत. त्यात मॅकेट्रॉनिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता यासारख्या शाखांचाही समावेश करण्यात आला आहे. हे विद्यार्थी पूर्णपणे कुशल होऊन संस्थेतून पदविका घेऊन बाहेर पडावेत यासाठी त्यांच्या अभ्यासक्रमात लघू व सूक्ष्म प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे. म्हणजे या विद्यार्थ्यांना प्रत्येक सत्राला नवनवीन प्रकल्प तयार करावे लागणार आहेत. ज्याचा फायदा त्यांना नोकरी आणि करिअरच्या वेळी होणार आहे.

**■ डिप्लोमा अभ्यासक्रमाची निवड का करावी?**

तीन वर्षांच्या कालावधीत परिपूर्ण कुशल बनवून नोकरी किंवा उद्योगास सक्षम बनविणारा अभ्यासक्रम म्हणून डिप्लोमा अभ्यासक्रमाची निवड नक्कीच होऊ शकते. आज करोनाकाळात जेव्हा नोकऱ्या कमी होत होत्या, तेव्हाही डिप्लोमाच्या २० टक्के विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळाल्या. यातच या अभ्यासक्रमाचे यश दडलेले आहे. केवळ नोकरीच नाही, तर पुढील शिक्षणासाठीही या अभ्यासक्रमाचा फायदा आहे. डिप्लोमा पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना इंजिनीअरिंगचे शिक्षण घ्यायचे असेल, तर कोणतीही प्रवेश परीक्षा न देता थेट दुसऱ्या वर्षाला प्रवेश मिळतो. असे विविध फायदे या अभ्यासक्रमाला असल्यामुळे याची निवड होऊ शकते.

(मुलाखत : नीरज पंडित)